दिनांक 22/02/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 252

विषय - नगरपरिषद हद्दीतील बांधकाम विकास शुल्क मधून विविध विकास कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 21/02/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद हद्दीतील विविध भागांतील नागरीकांचे प्राप्त अर्जानुसार बांधकाम विकास शुल्क मधून खालील कामे प्रस्तावित करणेत येत आहेत.

सदर कामे खालीलप्रमाणे.

1. विटा नगरपरिषद हद्दीतील खानापूर रोड ते मूळस्थान देवस्थान रेवणसिद्ध मंदिर रस्ता डांबरीकरण करणे.
2. विटा नगरपरिषद हद्दीतील येथील व्हिजन सिटी मधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.
3. विटा नगरपरिषद हद्दीतील श्रीनाथ कारखाना ते गणेश हुले रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे.
4. विटा नगरपरिषद हद्दीतील पंचशीलनगर लता भिंगारदेवे घर ते खानापूर रस्ता डांबरीकरण करणे.
5. विटा नगरपरिषद हद्दीतील हजारे मळा येथे घोडके विहिरीस संरक्षण भिंत बांधणे.
6. विटा नगरपरिषद हद्दीतील सराफ पेठ ते गणेश पेठ रस्ता डांबरीकरण करणे.
7. विटा नगरपरिषद हद्दीतील मायणी रस्ता जयराम ट्रेडर्स ते पंकज गुरव रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे.
8. विटा नगरपरिषद हद्दीतील मुंढेमळा येथे गणेश तावरे घर ते निवृत्ती पाटील घर रस्ता डांबरीकरण करणे.
9. विटा नगरपरिषद हद्दीतील कुंडल रोड ते रोहन कांबळे घर रस्ता ट्रिमिक्स कॉंक्रिटीकरण करणे.
10. विटा नगरपरिषद हद्दीतील मायणी रस्ता बालाजी बांबू डेपो ते मुबारक मुजावर घर रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे.
11. विटा नगरपरिषद हद्दीतील साळशिंगे रोड मोहन रोकडे घर ते सचिन किर्दत ते प्रकाश मांडवेकर घरापर्यंत गटर करणे.

पान नं 2 वर

12.विटा नगरपरिषद हद्दीतील विनोद गुळवणी घर ते रामचंद्र बिसूरकर घरापर्यंत बंदिस्त पाईप गटर व रस्ता डांबरीकरण करणे.

13.विटा नगरपरिषद हद्दीतील सचिन शितोळे घर ते उदय शितोळे घरापर्यंत गटर करणे व रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.

14.विटा नगरपरिषद हद्दीतील सुधीर शिंदे घर ते जगूबाई जगदाळे घरापर्यंत अंडरग्राऊंड गटर करणे.

15.विटा नगरपरिषद हद्दीतील शिवाजीनगर येथे उत्तम गायकवाड घर ते नेवरी रस्त्यापर्यंतचा रस्ता खडीकरण करणे.

तरी वरील कामांना बांधकाम विकास शुल्क मधून करणेस मंजूरी देत आहे. सदर कामांची अंदाजपत्रके तयार करून तांत्रिक मंजूरी घेणेत यावी. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 22/02/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 253

विषय - विटा नगरपरिषद हद्दीतील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत काम करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 21/02/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) मा.जिल्हा सहआयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडील सन 2023-2024 करिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर नियतव्यय पत्र क्र.नवि/कार्या-4/कावि-164/2023 दि.17/05/2023

3) मा.आमदार अनिल भाऊ बाबर विधानसभा सदस्य यांचेकडील दि.10/12/2023 रोजीचे पत्र.

संदर्भ क्र.2 अन्वये विटा नगरपरिषद हद्दीतील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर निधीतून प्रस्ताव पाठविणेबाबत कळविले आहे. संदर्भ क्र. 3 अन्वये मा.आमदार अनिल भाऊ बाबर विधानसभा सदस्य यांचेकडील पत्रानुसार सदर योजनेअंतर्गत काम सुचविणेत आलेले आहे.

सदर प्रस्ताव सादर करणेकरीता सुचवलेले काम खालीलप्रमाणे.

1. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 01 मधील साळशिंगे रोड ते मुंढेमळयाकडे जाणारा रस्ता मुरमीकरण, खडीकरण, डांबरीकरण व सिडी वर्क आर.सी.सी. गटर करणे.

तरी वरील काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) सन 2023-24 योजनेअंतर्गत कामांस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 22/02/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 254

विषय - नगरपरिषद हद्दीतील लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत विकास काम करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 21/02/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) मा.जिल्हा सहआयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडील सन 2023-2024 करिता लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत मंजूर नियतव्यय पत्र क्र.नवि/कार्या-2/कावि-211/2023 दि.17/05/2023

3) मा.जिल्हा सहआयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडील सन 2023-2024 करिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर नियतव्यय पत्र क्र.नवि/कार्या-4/कावि-164/2023 दि.17/05/2023

4) मा.आमदार अनिल भाऊ बाबर विधानसभा सदस्य यांचेकडील दि.10/12/2023 रोजीचे पत्र.

संदर्भ क्र. 2 व 3 अन्वये विटा नगरपरिषद हद्दीतील लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत संदर्भ क्र. 4 अन्वये मा.आमदार अनिल भाऊ बाबर विधानसभा सदस्य यांचेकडील पत्रानुसार सदर योजनेअंतर्गत खालील काम सुचविणेत आलेले आहे.

सदर प्रस्ताव सादर करणेकरीता सुचवलेले काम खालीलप्रमाणे.

1. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 05 मधील नेहरुनगर, घुमटमाळ ते हनूमान चौक पर्यंत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे.

तरी वरील काम हे प्रशासकीय ठराव क्र.249 दि.16/02/2024 अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूरी घेणेत आलेली होती.परंतु त्या ऐवजी सदरचे काम लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना 2023-24 अंतर्गत करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 22/02/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 255

विषय - विटा नगरपरिषद हद्दीतील कराड रोड येथील स्मशानभूमीमध्ये 3 नग आणि आंबेडकरनगर येथील स्मशानभूमीमध्ये 1 नग शवदाहीनी बसविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 21/02/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद हद्दीतील कराड रोड व आंबेडकरनगर येथील स्मशानभूमीची नगरअभियंता यांनी स्थळपाहणी केली असता कराड रोड येथील स्मशानभूमीमध्ये 3 शवदाहीनी व आंबेडकरनगर येथील स्मशानभूमीमध्ये 1 शवदाहीनी या नादुरुस्त व खराब झाले असलेचे दिसून आले. कराड रोड येथील स्मशानभूमीमध्ये 3 नग शवदाहीनी व आंबेडकरनगर येथील स्मशानभूमीमध्ये 1 नग शवदाहीनी बसविणे आवश्यक आहे. तरी सदर शवदाहीनी या नादुरुस्त व खराब झाले असलेने सदर दोन्ही ठिकाणी एकूण नवीन 4 शवदाहिनी बसविणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा